ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधान: " इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १९ पुणें, बुधवार तारीख १६ डिसेंबर, १९५३ अंक ४७

## विविध माहिती

**विमान कंपनीला कर्ज मंजूर**—एअर इंडिआ इंटरनॅशनल ह्या विमान वहातूक कंपनीला भारत सरकारनें २५ लाख रुपयांचें कर्ज मंजूर केलें आहे. कंपनी आपल्या परदेशीय वहातुकीसाठी दोन सुपर–कॉन्स्टेलेशन जातीचीं विमानें घेणार आहे. त्या खर्चापैकी कांहीं रक्कम सरकारनें सोसावयाची होती म्हणून ही मदत देण्यांत आली आहे.

**स्टेनलेस स्टीलची आयात**—बनारस येथील पितळेच्या भांड्यांच्या व्यापारी संघानें भारत सरकारला अशी विनंती केली आहे कीं स्टेनलेस स्टीलची आयात थांबविण्यांत यावी. अमेरिका आणि जपानमधून येणाऱ्या पोलादी भांड्यामुळें पितळेचीं भांडीं बनविण्याचा प्राचीन ग्रामोद्योग डबघाईस आला आहे असें सरकारला कळविण्यांत आलें आहे. त्याचप्रमाणें परदेशांत हातानें बनविलेल्या पितळेच्या भांड्यांची निर्यात करण्यांत यावी असें सुचविण्यांत आलें आहे.

**हैदराबाद राज्यांतील नव्या योजना**—हैदराबाद राज्य-सरकारनें भीर जिल्ह्यांत दोन नव्या पाटबंधाऱ्याच्या योजना हातीं घेण्याचें ठरविलें आहे. दोन्ही योजना पूर्ण करण्यास ४० लाख रुपये खर्च येणार असून त्यांच्या पाण्यानें ८,००० एकर जमीन भिजणार आहे. योजना पूर्ण होण्यास २॥ वर्षे लागतील असा अंदाज करण्यांत आला आहे.

**भारतामधील कापसाची लागवड**—चालू हंगामांत भारता-मधील कापसाची लागवड १,२९,५६,००० एकर जमिनींत करण्यांत आली आहे असें समजतें. गेल्या वर्षीच्या दुरुस्त अंदाजा-प्रमाणें १,२१,७४,००० एकर जमिनींत कापूस लावण्यांत आला होता. म्हणजे चालू सालीं लागवडींत ६·४ टक्के अगर एकूण ७,८२,००० एकर इतकी वाढ झाली आहे.

**कच्छच्या रणासंबंधीं योजना**—कच्छच्या वालुकामय रणाचा कांहीं भाग शेतीसाठी वापरतां येईल काय हें पहाण्या-साठी भारत सरकारनें एक तपासणीची योजना तयार केली आहे. सरस्वती आणि लुनी ह्या दोन नद्या कच्छच्या वाळवंटांतच लुप्त होतात. त्यांचें पाणी वापरतां येईल किंवा काय ह्यासंबंधींहि पाहणी करण्यांत येणार आहे. पहाणीसाठी १०,००० रुपये मंजूर करण्यांत आले आहेत

**हिशेबतपासणिसासाठी इमारत**— ओरिसा राज्याच्या अकौंटंट जनरलसाठी भुवनेश्वर येथें एक इमारत बांधण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे; इमारतीसाठी ५५ लाख रुपये खर्च येणार आहे. ह्याच इमारतींत हिशेबतपासणिसांची व त्यांच्या नोकरवर्गाची रहाण्याची सोयहि करण्यांत येईल.

**" राही " मास्कोच्या रजतपटावर**—नया संसार कंपनीचा ' राही ' हा चित्रपट दिल्ली येथें भारतामधील रशिअन वकिलाला दाखविण्यांत आला. वकिलांनीं चित्रपटाच्या कलेची तारीफ केली असें समजतें. ह्या चित्रपटाला रशिअन संवाद जोडून तो रशिआंत दाखविला जाणार आहे. फ्रान्स, इंग्लंड, झेकोस्लोव्हाकिआ, हंगेरी व पोलंड ह्या राष्ट्रांतूनहि तो दाखविण्यांत येणार आहे.

**आशिआई विद्यार्थ्यांची सोय**—मेलबोर्न येथील विद्यापीठांत आशिआई विद्यार्थ्यांची रहाण्याची सोय करण्यासाठीं एक वसति-गृह बांधण्याचें घाटत आहे. वसतिगृहासाठी फंड जमविण्याच्या कल्पनेला मलाया व सिंगापूरच्या सरकारांनीं पाठिंबा दर्शविला आहे. सिंगापूरच्या सरकारनें १,५०,००० रुपये मंजूर केले आहेत. वसतिगृह बांधण्यासाठी ३,००,००० पौंड खर्च येईल असा अंदाज आहे.

**मोटारीच्या धंद्यासाठी खास अधिकारी**—भारतीय सरकारनें मोटारीच्या धंद्यावर लक्ष ठेवण्यासाठी मेजर व्ही. डी. एस्. मेनन नांवाच्या खास अधिकाऱ्याची नेमणूक केली आहे. देशाला लागणाऱ्या मोटारी देशांतच तयार करण्यासाठी ज्या पांच कारखा-न्यांची निवड करण्यांत आली आहे त्यांच्या कामाच्या प्रगतीवर हा अधिकारी लक्ष ठेवणार आहे.

**छोट्या मोटारींचें उत्पादन**—भारतामधील मोटारींच्या तीन कारखान्यांनीं छोट्या मोटारी तयार करण्याच्या आपल्या योजना सरकारला सादर केल्या असून त्यांना सरकारची मान्यताहि मिळाली असल्याचें समजतें. मात्र छोट्या मोटारी तयार करण्याच्या मागे लागून मोठ्या गाड्या करण्याच्या कामांत अडथळा येतां कामा नये असें सरकारचें म्हणणें आहे.

**पोलादाच्या कारखान्याचा करार**—सुप्रसिद्ध जर्मन कारखानदार ' क्रप्स ' आणि ' डिमॅग ' ह्यांच्याशीं पोलादाचा कारखाना काढण्याबाबत चाललेल्या सरकारी वाटाघाटी पुऱ्या झाल्या आहेत असें समजतें. कारखाना काढण्यासंबंधीं सर्व योजना निश्चित करण्यांत आली आहे. मात्र कारखान्याचें संकल्पित वार्षिक उत्पादन १० लाख टनाऐवजीं ५ लाख टनच राहील अशी वार्ता आहे.

**पोस्टाची चूक भोंवली**—लंकेच्या सरकारनें पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकेची प्रसिद्धि करण्यासाठी सिंहली भाषेंत १०,००० पुस्तिका छापल्या होत्या. पण भाषांतर करतांना कांहीं चुका राहून गेल्यामुळें हीं सर्व पुस्तकें सरकारला रद्द करावीं लागलीं असें समजतें.

## दिल्ली राज्यांतील सहकारी चळवळ

दिल्ली राज्यांत सहकारी चळवळीचा प्रारंभ १९१९ साली करण्यांत आला. तेव्हांपासून आणि विशेषतः स्वातंत्र्य-प्राप्ती नंतरच्या काळांत सहकाराची प्रगतीच होत गेली आहे. १९४७ साली राज्यांतील सहकारी संस्थांची संख्या ४८५ होती, ती १९५१ साली ९८३ इतकी झाली. हल्ली त्यांची संख्या १,११६ आहे. चळवळीचा विकास व्हावा म्हणून दिल्ली राज्य-सरकारनें ३० जून १९५२ पर्यंतच्या वर्षांत २,२२,७३२ रुपये खर्च केला. सहकारी संस्थांच्या सभासदांची आजची संख्या ७१,६७५ आहे. १९४७ साली अशा सभासदांची ३१,४६६ होती. निर्वासितांनीं चालविलेल्या सहकारी संस्थांची संख्या ६०५ असून त्यांतील सभासदांची सरासरी संख्या ६५ आहे. जून १९५२ अखेर संपलेल्या वर्षांत १५२ नव्या सहकारी संस्थाची नोंदणी करण्यांत आली. त्यापैकीं ३२ औद्योगिक सहकारी संस्था होत्या, २५ विविध कार्यकारी होत्या, २१ बचत आणि पतीच्या होत्या. सहकारी संस्थांची तीन वर्गांत विभागणी करण्यांत आलेली आहे. (१) मध्यवर्ती सहकारी संस्था, (२) शेतकी सहकारी आणि (३) बिगर शेतकी सहकारी संस्था. १९४८ साली इंडिअन को-ऑपरेटिव्ह युनिअन ही संस्था रजिस्टर करण्यांत आली. शहरांतील आणि खेड्यांतील विविध प्रकारच्या सहकारी संस्थांच्या कार्याची जुळणी करणें आणि त्यांचें कार्य सुलभ करणें असा ह्या संस्थेचा हेतु आहे. निर्वासितांच्या कामाचें संघटन करणें, त्यांना कर्ज मिळवून देणें, यंत्रसामुग्री व कच्चा माल उपलब्ध करून देणें, ह्यासारखीं कामें करण्यांतच संस्था गुंत लेली आहे. संस्थेच्या सभासदांची संख्या १९५ आहे आणि खेळतें भांडवल २९.३३ लाख रुपये आहे. जवळ जवळ १३७ सहकारी संस्थांशीं ह्या मध्यवर्ती संस्थेला व्यवहार करावे लागतात.

---

## टाचणीनें दात कोरण्यांतील धोका

### बँक नोकरांना इशारा

गुरुवार दि. ३ रोजीं सीतावर्डीवरील (नागपूर) महाराष्ट्र बँकेंतील एक कारकून श्री. विष्णु गोविंद दिल्लीकर हे दातांशीं टांचणीचा खेळ करीत होते. टांचणी अचानकपणें घशांतून पोटांत गेली. टांचणी पोटांत गेल्यामुळें ती आतड्यांना टोंचेल व गंभीर परिस्थिति निर्माण होईल अशी भीति वाटल्यानें त्यांना नागपूरच्या प्रसिद्ध मेडिकल कॉलेजच्या दवाखान्यांत नेण्यांत आले.

येथें क्ष किरणांनीं त्यांचा फोटो घेण्यात आला, पोटांत टांचणी असल्याचें फोटोवरून दिसून आलें. टांचणीची जागा निश्चित समजली असल्यानें ऑपरेशन करून टांचणी काढून टाकावी असा निर्णय डॉक्टरांनीं घेतला. लगेच पेशंटचें ऑपरेशन झालें. टांचणीचा शोध सुरू झाला. आणि वेळ जाऊं लागला तसा 'पेशंट' टेबलावर 'फेल' होऊं लागला. हें पाहतांच ऑपरेशन थांबविण्यांत आलें.

त्यानंतर कांहीं वेळानें पेशंट शुद्धीवर आला. त्याला शौचास झालें. त्यानंतर पुन्हा क्ष किरण फोटो काढण्यांत आला. पण टांचणीचा पत्ता नव्हता. सारे डॉक्टर घाबरून गेले. अखेरीस एका डॉक्टरानें पेशंटचें शौच तपासून पाहण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणें करतांच तेथें टांचणी सांपडली. पेशंट आतां सुधारत आहे.

("महाराष्ट्र")


स्थापना १९३६

**युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा**

[ शेड्यूल्ड बँक ]

*पॅलेस स्ट्रीट, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ११-१२-५२ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,४९,९१५ |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,७९,००० |
| ठेवी | रु. | ६७,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ७८,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-१२-० | रु. ३-०-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | १-०-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन



**दि युनायटेड कमर्शिअल बँक लि.**

कलकत्ता.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ८ कोटी रु. |
| खपलेलें भांडवल | ... | ४ कोटी रु. |
| वसूल भांडवल | ... | २ कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ७५ लक्ष रु. |

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :

जी. डी. बिर्ला (चेअरमन)

| | |
|---|---|
| ईश्वरीप्रसाद गोयंका व्हाइस चेअरमन | रमणलाल जी. सरय्या व्हाइस चेअरमन |
| अनंत चरण लॉ | महादेव एल. डहाणूकर |
| बैजनाथ जालन | मदनमोहन आर. रुइया |
| गोविंदलाल बंगूर | मोहनलाल एल. शहा |
| पी. डी. हिमतसिंगका | मोतीलाल तापुरिया |
| रामेश्वरलाल नोपानी | नवीनचंद्र मफतलाल |

: जनरल मॅनेजर :

बी. टी. ठाकूर

भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्या सबंध जगभर एजन्सीच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.

# अर्थ

बुधवार, ता. १६ डिसेंबर १९५३

संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे




## औद्योगिक सहकाराची प्रगति

औद्योगिक सहकारी सोसायट्या आणि ग्रामोद्योग ह्याबाबतचा मुंबई राज्याच्या ३० जून, १९५२ अखेरचा अहवाल नुकताच हातीं आला आहे. सहकारी खात्यांत औद्योगिक सहकारी सोसायट्या आणि ग्रामोद्योग ह्यांसाठी एक स्वतंत्र शाखा सहा वर्षांपूर्वी स्थापन करण्यांत आली, त्याचा उद्देश औद्योगिक सहकारी चळवळीस चालना देणें असा होता. अल्पावधींतच औद्योगिक सोसायट्यांची संख्या ३१४ वरून १,२८२ वर गेली आणि त्यांच्या सभासदांची संख्या ४०,०४५ वरून १,४१,१७७ वर पोंचली. म्हणजे, दोन्हींताहि चौपट वाढ झाली. त्याबरोबर संस्थांचें कार्यक्षेत्रहि वाढलें आणि आतां झालेली प्रगति पचनी पाडण्याचें, त्या संस्थांची आर्थिक स्थिति सुधारण्याचें व त्यांची कार्यक्षमता वाढविण्याचें महत्त्वाचें काम करणें जरूरीचें झालें आहे. अर्थात, सहकारी खात्यास ह्याची जाणीव आहे. ग्रामोद्योगाची संघटना सहकारी तत्त्वावरच व्हावी, असें मत प्रभावी झालेलें असून प्लॅनिंग कमिशनचा अभिप्रायहि त्यास पोषकच आहे.

किंमतमिधील उतार आणि मंदीचें वातावरण ह्यांचा ग्रामोद्योगाच्या उत्पादनावर प्रतिकूल परिणाम झाला आहे. त्यामुळें अस्तित्वांत आलेल्या सोसायट्यांची बळकटी वाढविण्याचें महत्त्व अधिकच वाढलें आहे. विक्रीचे नवे मार्ग शोधून काढणें, मालाचा दर्जा सुधारणें, मोठे, मध्यम व लहान उद्योग एकमेकांशीं स्पर्धा करूं नयेत ह्या दृष्टीनें त्यांचीं कार्यक्षेत्रें वांटून देणें, सुधारलेल्या यंत्रांचा व युक्त्यांचा वापर करण्याचें कामगारांना उत्तेजन देणें, इत्यादि उपाय ह्यासंबंधांत अंमलांत आणावयास पाहिजेत. ह्या बद्दलहि दुमत नाहीं. विकास योजनांमुळें कित्येक केंद्रांतून ग्रामोद्योगांचें संवर्धन करण्याची उत्कृष्ट संधि प्राप्त झालेली आहे.

प्रस्तुत अहवालांतील आकड्यांवरून १९५१–५२ मधील प्रगतीचा तपशील समजून येतो. औद्योगिक सहकारी संस्था १२१२ च्या १२८१ झाल्या; त्यांचे सभासद १·२२ लाखांचे १·४१ लाख झाले, त्यांचें भांडवल व फंड होहि वाढलें, त्यांची उलाढाल ९·०३ कोटी वरून १०·५९ कोटींवर गेली परंतु त्यांचें खेळतें भांडवल मात्र ३५८ लाखांचे ३४१ लाखांवर आलें. डिस्ट्रिक्ट इंडस्ट्रिअल असोसिएशनला जोडलेल्या सहकारी सोसायट्यांची संख्या वाढली आहे. परंतु असोसिएशन्समार्फत झालेली विक्री मात्र कमी झाली आहे. असोसिएशन्सनीं पुरविलेल्या कच्च्या मालांतहि मोठी घट झाली आहे. प्रांतिक इंडस्ट्रिअल असोसिएशनचे सभासद, शेअर भांडवल व फंड वाढले, परंतु खेळतें भांडवल कमी झालें ह्याचें कारण मंदी हें होय. नियंत्रणें उठल्यानंतर असोसिएशनला आपल्या कार्यक्षेत्रांत नव्या गोष्टी घ्याव्या लागतील. अहवालांत दिलेल्या तपशीलावरून औद्योगिक सहकारी संस्थांच्या कार्याची चांगली कल्पना येईल, त्यांचेपुढील अडचणी लक्षांत येतील व प्रगतीची दिशाहि समजून येईल. प्रतिकूल आर्थिक परिस्थितींत त्यांची उपयुक्तता कशी टिकवितां येईल हा महत्त्वाचा प्रश्न त्यांचेपुढें व सहकारी खात्यापुढें आज उभा आहे.

### हिंदी साबण कारखानदारांची लिव्हर ब्रदर्सविरुद्ध तक्रार

साबण कारखानदार संघाचे अध्यक्ष, डॉ. जे. एस. बदामी ह्यांनीं, भारतांतील साबणाच्या धंद्याची सर्वांगीण चौकशी करण्यासाठीं स्वतंत्र कमिटी नेमण्यांत यावी, असें प्रतिपादन केलें आहे. श्री. जे. आर. डी. टाटा ह्यांनीं अशीच मागणी आधींच केलेली आहे. हिंदी साबण कारखानदारांचें म्हणणें असें कीं, त्यांच्या उत्पादनापैकीं २०% मालाचा जेमतेम उठाव होतो, पण लिव्हर ब्रदर्सचा कारखाना मात्र रात्रंदिवस चालू राहूं शकतो, ते किंमती उतरवूं शकतात आणि उत्पादनवाढीच्या योजना आखूं शकतात, ह्यामागें कांहींतरी विशेष रहस्य असलें पाहिजे. लिव्हर ब्रदर्सला कांहीं विशेष अनुकूल गोष्टी असतील, किंवा ते इतर कारखानदारांचें नुकसान करण्यासाठी अनिष्ट स्पर्धा तरी करीत असतील. लिव्हर ब्रदर्सचा उद्देश इतर कारखाने बंद पाडून वा त्यांना सामील करून भारतांत मोनांपोलीचें स्थान मिळविण्याचा आहे, अशी हिंदी साबण कारखानदारांची तक्रार आहे. "गिऱ्हाइकांचें हित" किंवा "परदेशी भांडवलास अन्याय्य वागवणूक" अशा तऱ्हेचे फोल मुद्दे पुढें आणण्यांत अर्थ नाहीं, असें डॉ. बदामींचें म्हणणें आहे.

### डमी बँकेच्या स्थापनेस चालना

श्री. बी. आर. केंभावी ह्यांनीं "अर्था"च्या दिवाळी अंकांत डमी (प्रायोगिक) बँकेची कल्पना मांडली होती, तिचें प्रत्यक्षांत रूपांतर करण्याचे त्यांचे प्रयत्न चालू आहेत. त्यांच्या योजनेस बराच पाठिंबा मिळालेला असून, डमी बँकेच्या प्रत्यक्ष स्थापनेची चर्चा चालू आहे, असें समजतें. बुधवार, दि. १६ रोजीं सायंकाळीं पुण्यांतील कांहीं बँकर्सची एक सभा बोलाविण्यांत आली आहे, तिचेमध्यें डमी बँकेसंबंधीं अधिक तपशीलवार चर्चा होईल आणि अशी बँक अस्तित्वांत आणण्यासाठी संघटना–समिति नेमण्यांत येईल, असें कळतें.

### पाकिस्तानी रुपया १०० पैंचा होणार

येत्या एप्रिलपासून पाकिस्तानांत दशमान पद्धतीचें चलन सुरू होईल आणि पाकिस्तानी रुपया १०० पैंचा समजला जाईल. काटकसर म्हणून नव्या पैसेरीज इतर नाणीं तूर्त पाडण्यांत येणार नाहींत. २५ पै म्हणजे पावली व ५० पै म्हणजे अधेली, असें प्रमाण राहील. २० पैचें नवें नाणें लवकरच पाडलें जाईल.

### परदेशी हुंडणावळीचा हैद्राबाद बँकेस परवाना

परदेशी हुंडणावळीचा व्यवहार करण्याचा परवाना रिझर्व्ह बँकेनें हैद्राबाद स्टेट बँकेस दिला आहे.

### कापड गिरण्यांच्या धंद्याच्या शाखांतील संशोधन

मुंबईच्या गिरणीमालक संघाची १ कोटी रुपयांची "टेक्स्टाइल रिसर्च इन्स्टिटयूट"ची योजना भारत सरकारनें नेमलेल्या कॉटन टेक्स्टाइल फंड कमिटीनें मंजूर केली आहे. ही इन्स्टिटयूट गिरण्यांच्या सर्व शाखांचे बाबतींत संशोधनाचें कार्य करील. ती १८६० च्या फॅंडली सोसायटीज ॲक्टखालीं नोंदविण्यांत येईल.

## कण आणि क्षण

(लेखक व प्रकाशक: श्रीपाद वामन काळे, दुर्गाधिवास, पुणें ४; पृष्ठें १६८; किंमत अडीच रुपये.)

इंग्रजी वाङ्मयांत 'मित्र कसे जोडावे' जगांत वागावें कसें?' अशा विषयावर अनेक पुस्तकें प्रसिद्ध आहेत. परंतु मराठींत अशा प्रकारच्या विषयावर चांगलीं पुस्तक फारशी नाहींतच. श्री. श्री. वा. काळे यांचें 'कण आणि क्षण' हें पुस्तक ही उणीव भरून काढील असें वाटतें.

सुखी जीवनास पोषक अशा सूचना या पुस्तकांत दिल्या असून नवरा कसा मिळवावा या प्रश्नापासून ते पाहुणचार, मिळविल्या स्त्रीच्या अडचणी, इत्यादि विविध विषयांचें सत्य स्वरूप श्री. काळे यांनीं उघड करून दाखविलें आहे.

'हें टाळतां येणार नाहीं काय?' 'जरा जपूनच बोला' 'तुमची कौटुंबिक राहणी तपासून पहा' या लेखांतून व्यक्त केलेले विचार कुणालाहि पटतील असेच आहेत.

या पुस्तकांतील वेगवेगळे कण भगिनी, किर्लोस्कर, स्त्री, वाङ्मयशोभा, इत्यादि मासिकांत प्रसिद्ध झाले होते. या सर्व लेखांतून कौटुंबिक व सामाजिक जीवनास मार्गदर्शक असे विचार श्री. काळे यांनीं व्यक्त केले आहेत. पुस्तक वाचतांना बरेच वेळां या कणांतील विचार वाचकांच्या हृदयांत तात्काळ घर करून राहतील असे आहेत, इतकेंच नाहीं तर 'कळतें पण वळत नाहीं' अशी स्थिति अनेकदां होते.

श्री. काळे यांनीं कणाकणाचा व क्षणाक्षणाचा विनियोग करण्यासाठीं सांगितलेला 'कर्मयोग' सर्वांनीं शिकावयास हवा असा आहे. आणि हा 'कर्मयोग' श्री. काळे यांनीं सोप्या भाषेंत सांगितला आहे. आदर्श वागणुकीबाबत कुणी चार शब्द सांगितले तर ऐकणारा सांगणाऱ्याचा दर्जा लक्षांत घेऊन त्याचें ऐकून घेतो. परंतु एरवीं उपदेशामृत हें कित्येकांना कडूच वाटत असल्यामुळें शर्करावगुंठित अशा शब्दांत 'विध्यर्थी' गोष्टी सांगणें आवश्यक असते. श्री. काळे यांनीं ही गोष्ट लक्षांत घेऊन आपल्या कणांचें स्वरूप आकर्षक केलें आहे त्याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें जरूर आहे.

लग्नप्रसंगीं नांवापुरताच 'संसार' हा शब्द असलेलीं पुस्तकें देण्याऐवजीं 'कण आणि क्षण' सारखें पुस्तक भेट दिल्यास एक उपयुक्त पुस्तक भेट दिल्यासारखें होईल.

"लोकसत्ता" ६-१२-५३

---

## दि मराठा को. के. बँक लि., बेळगांव

बँकेचें शेअरभांडवल, ठेवी, रिझर्व्ह व इतर फंड, खेळतें भांडवल ह्या सर्वांत वाढ झाली आहे. खेळतें भांडवल आतां ४,९६,७३२ रु. झालें आहे. गतवर्षाप्रमाणें ह्याहि वर्षी बँक "अ" वर्गांत आहे. "ही बँक बेळगांव शहरांत असणाऱ्या अर्बन बँकांमध्यें योग्य नियंत्रण ठेवून कामकाज करणाऱ्या बँकांपैकी एक उत्तम बँक आहे. बँकेची वाढ दरसाल होतच आहे." असा स्पेशल ऑडिटरांचा शेरा आहे. निव्वळ नफा ६,४८५ रु झाला व भागीदारांना ५% डिव्हिडंड मिळालें. (चेअरमन: गजानन महादेव भातखंडे. सेक्रेटरी: ए. के. सोमणाचे, बी. कॉ. ऑप.)

## जपानची औद्योगिक मदत

आशिआंतील मागासलेल्या देशांना जपानकडून बरीच मदत मिळण्याची शक्यता आहे असें भारतीय उद्योगपती पुष्कळ वेळां सांगत असतात. भारतानें जपानकडून रेल्वे इंजिनें घेण्याचा जो सौदा केला आहे त्यावरून वरील म्हणण्याला पुष्टीच मिळते. जपानमधील दोन मोठ्या कारखान्यांनीं भारताशीं करार करून १२५ रेल्वे एंजिनें देण्याची तयारी दाखविली आहे. सर्व एंजिनांची किंमत ३५,५०,०००,००० येन होईल असें समजतें. दि जपान रोलिंग स्टॉक कंपनी पुढील वर्षाच्या ऑगस्टपर्यंत भारताला ५० एंजिनांचा पुरवठा करणार आहे. त्यांची किंमत ५००,०००,००० येन इतकी होईल. टोकिओमधील हिटाची वर्क्स ह्या कारखान्याकडून भारताला मोठ्या आकाराचीं ७५ रेल्वे एंजिनें मिळणार आहेत. त्यांची किंमत २,५००,०००,००० येन होईल. जपानी कारखाने आग्नेय आशिआंतील इतर देशांनाहि औद्योगिक महत्त्वाचा माल पुरविण्याच्या मागण्या स्वीकारीत आहेत. जपानी रोलिंग स्टॉक कंपनीनें सयामला ४५ रेल्वे एंजिनें, ७३० मालवाहू डबे आणि ४५ प्रवासी डबे देण्याचें कबूल केलें आहे. जपानमधील एका रेशमी कापडाच्या गिरणीनें पाकिस्तानमधील एका कंपनीशीं सहकार्य करून पाकिस्तानांत एक कापडाची गिरणी काढण्याचें ठरविलें आहे अशी वार्ता आहे. पाकिस्तानमधील ह्या संकल्पित गिरणीचें भांडवल ७०,०००,००० रुपये असेल. ह्या भांडवलापैकीं ४९ टक्के भांडवल जपानी कंपनी गुंतविणार आहे. मात्र तें पैशाच्या रूपानें न गुंतवितां मालाच्या रूपानें गुंतविण्यांत येणार आहे. जपानी कंपनी भांडवल म्हणून २५,००० सुताच्या चात्या आणि ५०० यांत्रिक माग पुरविणार आहे.

---

## रशिआंत हिंदी चित्रपट-महोत्सव

भारतीय बोलपटांचा रशिआंत भरविण्यांत येणारा पहिलाच महोत्सव पुढील वर्षाच्या उन्हाळ्यांत मास्को येथें होईल असें दिसत आहे. रशिआच्या बोलपट व्यवसायाचे भारतामधील प्रतिनिधी मि कुलबिआसिन हे ह्या विषयासंबंधीं भारतीय सरकारच्या अधिकाऱ्यांशीं वाटाघाटी करीत आहेत असें समजतें. भारतामधील उत्तमोत्तम चित्रपट रशिआंतील प्रेक्षकांना दाखविणें असा महोत्सवाचा उद्देश आहे. रशिआंत साजरा होणाऱ्या महोत्सवाला भारतामधील नट, नटी, निर्माते व तंत्रज्ञ ह्यांचें एक प्रतिनिधी मंडळ आलें तर त्यांचें स्वागत करण्यांत येईल असें मि. कुलबिआसिन ह्यांनीं सांगितलें. भारतामध्यें तयार झालेल्या १५ वेचक चित्रकृती महोत्सवासाठी रशिआंत धाडण्यांत येणार आहेत. त्यांत 'दो बिघा जमीन', 'झांशी की राणी', 'अवारा', 'बैजू बावरा', 'बावला' आणि 'राही' ह्या बोलपटांचा समावेश करण्यांत आला आहे. भारतांत परदेशीय चित्रपट आणण्यासंबंधींची परिस्थिति अशी आहे कीं इंग्रजी भाषा बोलणाऱ्या देशाव्यतिरिक्त इतर देशांतून चित्रपट आणावयाचे झाल्यास ते दर वर्षी आठापेक्षा अधिक आणतां येत नाहींत. अशा प्रत्येक चित्रपटाच्या फक्त दोनच आवृत्त्या आणतां येतात. हा नियम रशिआ आणि इतर युरोपिय देशांना बराच जाचक होत आहे. भारतांत चित्रनिर्मिति करण्यासंबंधीं बोलतांना मि. कुलबिआसिन म्हणाले कीं हिंदी नट आणि दिग्दर्शक ह्यांच्या साह्यानें चित्रपट काढण्याची रशिआची इच्छा आहे. सम्राट अशोकाचें जीवन, शाकुंतल, महात्मा गांधींचें जीवन, ह्यासारख्या विषयावर बोलपट काढणें रशिअन स्टुडिओजना आवडेल.

## हातानें भात भरडण्याच्या उद्योगाची योजना

### ( १९५३–५४ )

(सो. गं. शेंडे, प्रादेशिक संघटक, मुं. राज्य ग्रामोद्योग समिति, महाराष्ट्र विभाग ).

### सद्यःस्थिति

महाराष्ट्रांत अंदाजें सहा लाख टन भात दरसाल निर्माण होतें. हें भात भरडणें आणि सडणें हा ग्रामीण भागांतील शेतीशीं संबंधित असा फार महत्त्वाचा उद्योग आहे. हजारों लोकांना काम व उपजीविका त्यांतून उपलब्ध होऊं शकते. भातसडीच्या गिरण्यांपासून होणाऱ्या स्पर्धेला टक्कर देऊन हा धंदा अजूनहि खेडोंपाडीं तग धरून आहे. धान्य-नियंत्रण आणि सरकारतर्फे भाताची वसुली सुरूं झाल्यापासून मात्र गिरण्याद्वारां रेशनिंग-मध्यें तांदूळ पुरवण्यासाठी भात भरडून घेण्याचें प्रमाण बरेंच वाढलें. सध्यां साधारणपणें एकूण निर्माण होणाऱ्या भातापैकीं ५० टक्के हातानें व ५० टक्के गिरणींतून भरडलें व सडलें जातें असें मानावयास हरकत नाहीं.

भात-निर्मितीच्या प्रदेशांतील स्त्रियांना त्यांच्या फुरसतीच्या वेळांत हा धंदा फारच उपयुक्त आहे. तांदुळाच्या उताऱ्याचें प्रमाणहि हातसडीच्या प्रक्रियेंत गिरणीच्या उताऱ्याइतकेंच जवळजवळ पडतें. शिवाय सत्त्व आणि चवीच्या दृष्टीनें हात-सडीचा तांदूळ यांत्रिकसडीच्या तांदुळापेक्षा श्रेष्ठ प्रतीचा मानला जातो.

### समस्या

( १ ) भाताची वसुली आणि तांदूळ तयार करण्याचे कामीं सरकारचें सध्यांचें धोरण प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष रीतीनें तांदुळाच्या गिरण्यांना पोषक स्वरूपाचें आहे. यामुळें हातसडीच्या धंद्यावर बराच प्रतिकूल परिणाम झालेला आहे व ग्रामीण भागांत तांदुळाच्या गिरण्यांचा प्रसार वाढत्या प्रमाणावर झाला आहे व होत आहे आणि त्यामुळें हातसडीत तांदुळाचा हा ग्रामोद्योग नामशेष होण्याची अवस्था निर्माण झाली आहे.

(२) भात भरडण्याचीं व सडण्याचीं अवजारें, उदा० जातणी, ढेंकी यांच्यांत बरीच सुधारणा होण्याची आवश्यकता आहे. सध्यांच्या अवजारांनीं श्रम जास्त लागतात, तांदुळाचा उताराहि योग्य प्रकारें मिळत नाहीं. शिवाय कोंडा व कणी सहज रीतीनें अलग करणेंहि जड जातें.

( ३ ) शहरी लोकांप्रमाणें फार सड देऊन पांढरा शुभ्र केलेला तांदूळ वापरण्याची वृत्ति सर्वत्र वाढलेली आहे. त्यामुळें असा तांदूळ हातसडीचा असला तरी अन्नाच्या दृष्टीनें त्याचें मूल्य कमीच होतें. त्याचप्रमाणें अति धुण्यानें व चुकीच्या पद्धतीनें शिजवण्यानेंहि तांदुळांतील सत्त्वांश बराच कमी होतो.

( ४ ) बऱ्याच ठिकाणीं जातणी अगर ढेंक्या पडून आहेत. परंतु भातनिर्मितीच्या प्रदेशांतील ग्रामीण भागांत भात सांठवून ठेवण्यासाठी योग्य अशीं गुदामें व हंगामांत भात खरेदीसाठी लागणारा पैसा यांचा अभाव असल्यामुळें अशा केंद्रांना कामा-साठी भात उपलब्ध होऊं शकत नाहीं.

वरील अडचणी लक्षांत घेऊन या महत्त्वाच्या ग्रामोद्योगाचा विकास करण्यासाठी ग्रामोद्योग समितीनें चालूं १९५३–५४ सालीं मुंबई राज्यांत एकूण ८० केंद्रें सुरूं करण्याचें ठरविलें आहे. त्यांपैकीं २० केंद्रें महाराष्ट्रांत असतील आणि त्याकरतां समितीनें अ. भा. खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या साहाय्यानें १९५३–५४ ची खालीलप्रमाणें योजना आंखलेली आहे.


**सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.**
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव मुंबई
शेअर भांडवल व रिझर्व रु. ११,७०,१००
ठेवी .... .... .... रु. १,१९,११,७००
एकूण खेळतें भांडवल रु. १,३३,९४,९००
शाखा:- दादर, माहीम
बँकेचे सर्व व्यवहार केले जातात
शाखा:- बेळगांव, पुणें
स्थापना १९१८


### १९५३–५४ चा कार्यक्रम

( १ ) हातसडीच्या तांदुळाचा उद्योग करणाऱ्यांसाठी सहकारी सोसायट्या अगर संस्था स्थापन करणें. त्याचप्रमाणें असलेल्या संस्थांना चालना देणें.

( २ ) ढेंकी अगर उखळी यांच्याऐवजीं जातणी आणि हात-पंखा यांच्या उपयोगाचा अवलंब करून त्यांचा प्रसार करणें.

( ३ ) सत्त्वयुक्त आहाराच्या दृष्टीनें कमी सडलेल्या तांदुळाची उपयुक्तता व महत्त्व यांचा प्रचार करणें आणि योग्य पद्धतीनें तांदूळ शिजवण्याची पद्धत समजावून देणें.

( ४ ) या उद्योगाच्या अवजारांची सुधारणा करून तीं चाल-वण्यास हलकी जातील, तसेंच तांदुळाच्या फुटीचें प्रमाण कमी होईल व न सडलीं गेलेलीं भातखंडें तांदुळापासून सहज रीतीनें वेगळीं काढतां येतील यासाठीं संशोधन व प्रयोग करणें.

वर सांगितल्याप्रमाणें महाराष्ट्रांतील भाताची पैदास होणाऱ्या निरनिराळ्या आठ प्रमुख जिल्ह्यांत हातसडी तांदुळाचीं २० केंद्रें १९५३–५४ च्या चालू हंगामांत सुरू करण्याचें ठरलें आहे. साधारणपणें सहकारी सोसायट्या, सामाजिक संस्था, आश्रम, ग्रामपंचायती, अशा संस्थांना हीं केंद्रें चालवतां येतील. ग्रामोद्योग समिति स्वतःहि अशीं केंद्रें जरूरीनुसार चालवील.

### कामाची व्यवस्था व देखरेख

ठाणा, कुलाबा, रत्नागिरी, कोल्हापूर, दक्षिण व उत्तर सातारा, अहमदनगर, नाशिक व पश्चिम खानदेश या जिल्ह्यांत हातसडीच्या ग्रामोद्योगावर विशेष भर देऊन तें काम वाढविण्याचें योजिलें आहे. या कामाच्या संचालनासाठीं व देखरेखीसाठी २ निरीक्षक असतील. त्यांच्या कामाचें स्वरूप साधारणपणें खालीलप्रमाणें असेल.

( १ ) उत्पादक सोसायट्यांची संघटना करणें.

( २ ) जातणी आणि पंखे यांच्या उपयोगाचा प्रसार करणें.

( ३ ) भातसडीच्या प्रक्रियेंतील तांदुळाच्या उताऱ्याचें प्रमाण, फूट, सडण्याचें प्रमाण इत्यादि बाबींवर लक्ष ठेवून नियंत्रण ठेवणें.

( ४ ) अन्न-सत्त्वदृष्ट्या कमी सड दिलेला तांदूळ हा अति सड दिलेल्या तांदुळापेक्षां पौष्टिक असतो हें निरनिराळ्या साधनाद्वारां प्रचार करून लोकांना पटवून देणें.

( ५ ) या ग्रामोद्योगाच्या विकासाकरितां आवश्यक असलेल्या इतर गोष्टी करणें.

### पू. युरोप आणि प. युरोप ह्यांच्यामधील व्यापार

गेल्या कांहीं महिन्यांत ब्रिटिश कारखान्यांनीं रशिआकडून आलेल्या यंत्रसामुग्री पुरविण्याच्या मागण्या स्वीकारल्या आहेत, असें समजतें. ह्या यंत्रसाहित्यांत विजेच्या निर्मितीच्या आणि इतर यांत्रिक अवजारांचा समावेश आहे. ह्याच सुमारास जर्मन कारखानदारींहि झपाट्यानें प्रगति करीत असल्याच्या वार्ता आल्या आहेत. जर्मनीलाहि पूर्व युरोपांतील राष्ट्रांशीं व्यापार करण्याची संधि मिळाल्यास ती हवी आहे, असें म्हणतात. एकंदरींनें पूर्व व पश्चिम युरोपांत होणारा व्यापार वृद्धिंगत होण्याचीं चिन्हें दिसत आहेत. कांहीं दिवसांपूर्वी रशिआनें बँक ऑफ इंग्लंडकडे बरीच चांदी आणि सोनें पाठविलें आहे. त्यावरून सो. रशिआला पौंडांची टंचाई भासत असावी असा अंदाज करण्यांत येत आहे. ब्रिटनच्या बाजारांत आपलें सोनें व चांदी विकून रशिआला पौंडांचा पुरवठा होऊं शकेल. तसें झालें तर ती गोष्ट ब्रिटनच्याहि फायद्याची आहे; कारण रशिआकडून येणाऱ्या आयातींत वाढ करण्यावरच ब्रिटनची पूर्व-युरोपकडील निर्यात वाढणें अवलंबून आहे. पूर्व युरोपांतील राष्ट्रांकडून युद्धापूर्वी ब्रिटन जितकी आयात करीत होतें त्याच्या मानानें ब्रिटनची आयात सरासरी निम्मीच आहे. पण रशिआकडून कोणता माल आयात करावयाचा हाहि प्रश्नच आहे. रशिआनें आपल्या शेतीची पुनर्घटना चालविली आहे. ती पूर्ण होईपर्यंत रशिआकडून शेतीचा माल फारसा मिळण्याची शक्यता नाहीं. ब्रिटनला रशिआकडून असा माल हवा आहे कीं, ज्याच्या आयातीमुळें डॉलर्सच्या कक्षेंतील देशांवरील परावलंबित्व कमी होईल. रशिआनें ब्रिटनला कापूस देऊं केला असून त्याचे नमुने लँकेशायरला येऊन दाखल झालेले आहेत. लँकेशायरच्या गिरण्यांना कापसाची टंचाई भासण्याची शक्यता आहे.

---

### रिझर्व्ह बँक-कायद्यांत दुरुस्ती

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (अमेंडमेंट अँड मिसलेनीअस प्रोव्हिजन्स) बिल पार्लमेंटांत मांडण्यांत आलें आहे. तें मंजूर झालें, म्हणजे शेतीसाठी मध्यम मुदतीच्या कर्जाकरितां रिझर्व्ह बँक आणखी ५ कोटी रु. देऊं शकेल. सध्यांच्या कायद्याप्रमाणें, रिझर्व्ह बँक स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकांना १२ कोटी रु. मोसमी शेतीव्यवसायासाठी देऊं शकते. प्रस्तुत बिलानें मोसमी शेती-व्यवसायाची व्याप्ति वाढविली आहे, आणि त्यांत लोणी, तूप, मलई, गूळ, दूध, भाताचें सडणें, कपाशींचे गठ्ठे बांधणें, इत्यादिहि गोष्टी समाविष्ट होतील. स्टेट फिनॅन्स कॉर्पोरेशन्स व सहकारी बँका ह्यांना, लहान आकाराच्या ग्रामोद्योगांस मदत करण्यासाठी कर्जें देणें रिझर्व्ह बँकेस शक्य व्हावें अशीहि सरकारची योजना आहे.

---

### भारी किंमतीच्या नोटा पुनः सुरू होणार

एक हजार, पांच हजार व दहा हजार रुपयेवाल्या चलनी नोटा काढण्याचें रिझर्व्ह बँकेनें ठरविलें आहे. त्याची सर्व पूर्व-तयारी झाली आहे.

o

### फॉरिन एक्सचेंजच्या व्यवहाराची सोय

रिझर्व्ह बँकेच्या फक्त चार शाखांत हल्लीं परराष्ट्रीय हुंडणावळीच्या व्यवहाराची सोय आहे. रिझर्व्ह बँकेच्या सरकार ठरवील त्या कोणत्याहि शाखेंत ती सोय उपलब्ध करतां येण्याची कायदेशीर तरतूद केली जात आहे.


## दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

टेलिफोन नं. २५४६१, ३१,६८६ | पोस्ट बॉक्स नं. ४७२, तारेचा पत्ता : फार्मबँक

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगांसाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल

| | |
|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. ३३,९९,१५० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. १६,००,००० |
| | रु. ५९,९९,१५० |
| गंगाजळी व फंड | रु. ५४,२३,९०० |
| ठेवी | रु. ९,२५,२६,५०० |
| खेळतें भांडवल | रु. १२,२९,०२,८०० |

### १६ जिल्ह्यांमध्यें ६७ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

वा. पु. वर्दे
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.



## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक) खोपोली (जि. कुलाबा)

श्री. बी. बी. वाळवेकर (अध्यक्ष) | श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |

### एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. वाळवेकर B. A., LL. B.
श्री. भी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.

## आगामी कंपनी कायद्यांतील कांहीं तरतुदी

### डायरेक्टर बोर्ड, त्याचे अधिकार व त्यांच्या मर्यादा

प्रत्येक पब्लिक कंपनीस, आणि जी प्रायव्हेट कंपनी पब्लिक कंपनीची सबसिडिअरी कंपनी आहे, अशा कंपनीस किमान तीन डायरेक्टर तरी असले पाहिजेत.

पब्लिक कंपनीच्या व पब्लिक कंपनीची सबसिडिअरी कंपनी असलेल्या प्रायव्हेट कंपनीच्या बोर्डातील एकूण डायरेक्टरांपैकी किमान दोन तृतीयांश सभासद तरी फिरत्या अनुक्रमानें निवृत्त झाले पाहिजेत, व ते कंपनीच्या साधारण सभेनें निवडले गेले पाहिजेत.

मॅनेजिंग एजंटाशीं संबंधित अशा जवळच्या कांहीं लोकांना कंपनीचे निवृत्त होण्याजोगे डायरेक्टर म्हणून निवडतां येणार नाहीं. (उदाहरणार्थ, कंपनीचा नोकर, मॅनेजिंग एजंटाचा नोकर किंवा भागीदार, मॅनेजिंग एजन्सीचा भागीदार किंवा नोकर, मॅनेजिंग एजन्सीच्या प्रायव्हेट कंपनीचा सभासद किंवा नोकर, मॅनेजिंग एजन्सीच्या पब्लिक कंपनीचा अधिकारी वा नोकर.)

कंपनीनें स्पेशल ठराव करून मात्र अशा लोकांची डायरेक्टर म्हणून नेमणूक करण्यास हरकत नाहीं. अशा नेमणुकीचें प्रयोजन ठरावांत नमूद केलें पाहिजे.

साधारण सभेंत डायरेक्टरांची नेमणूक करतांना एकाच ठरावानें दोन किंवा अधिक लोकांची नेमणूक करतां कामा नये. एकाच ठरावानें अशी नेमणूक करावी, असा ठराव सभेनें अगोदर एकमतानें मंजूर केलेला असेल, तर मात्र ह्या पद्धतीनें नेमणूक करतां येईल. प्रत्येक डायरेक्टराची नेमणूक स्वतंत्र ठरावानें केली पाहिजे.

निवृत्त होणाऱ्या डायरेक्टराव्यतिरिक्त इतर कोणाची नेमणूक सभेनें करण्यापूर्वी त्याची डायरेक्टर म्हणून काम करण्यास तयार असल्याबद्दलची लेखी संमति रजिस्ट्रारकडे नोंदलेली असली पाहिजे.

कोणीहि मनुष्य २० पेक्षा जास्त कंपनींत एकाच वेळीं डायरेक्टर असूं शकणार नाहीं. नवीन कायदा अंमलांत आल्यावर २० पेक्षा ज्यास्त ठिकाणीं डायरेक्टर असणारानें एका महिन्याचे आंत २० पेक्षा ज्यास्त नाहींत एवढ्याच कंपन्यांत डायरेक्टर राहिलें पाहिजे. बाकीच्या ठिकाणीं राजीनामा दिला पाहिजे. राजीनामा पाठवितांक्षणींच तो अंमलांत येईल. ह्या नियमांतून प्रायव्हेट कंपन्या (पब्लिक कंपनीच्या सबसिडीअरी नसलेल्या) वगळल्या आहेत.

६५ व्या वर्षांवरील मनुष्याची डायरेक्टर म्हणून नेमणूक करतां येणार नाहीं. ६५ वें वर्ष संपल्यावर जी वार्षिक साधारण सभा होईल, त्या वेळीं त्याची जागा खाली होईल.

साधारण सभेनें, वयाची मर्यादा लागू न करून, ६५ वर्षांवरील मनुष्याचाहि तसा ठराव करून नेमणूक करण्यास हरकत नाहीं. अशा ठरावाची स्पेशल नोटीस देण्यांत आली पाहिजे व त्यांत संबंधित मनुष्याचें वय निर्दिष्ट केलें पाहिजे.

प्रत्येक दोन महिन्यांतून एकदां तरी डायरेक्टर बोर्डाची सभा झाली पाहिजे. सभेचा कोरम एकूण डायरेक्टरांच्या एकतृतीयांश किंवा दोन डायरेक्टर, जी संख्या जास्त असेल, तो राहील. कोरमच्या अभावीं सभा तहकूब झाली, तर दोन महिन्यांत एकदां तरी सभा भरली पाहिजे हा नियम मोडला गेला असें मानलें जाणार नाहीं. तहकूब सभा, आर्टिकल्समध्यें दुसरी तजवीज नसेल तर, पुढील आठवड्यांत त्याच वारीं त्याच वेळीं भरेल.

कंपनीला जे अधिकार आहेत ते डायरेक्टरांना बजावतां येतील. खालील अधिकार फक्त डायरेक्टरांनाच बजावतां येतील व डायरेक्टरांच्या सभेंत ठराव करूनच त्यांची अंमलबजावणी करतां येईल.

(१) डिबेंचर्स काढणें
(२) शेअरहोल्डर्सवर कॉल करणें
(३) कर्जें काढणें
(४) कंपनीचे पैसे गुंतविणें
(५) कर्जें देणें, इत्यादि

(३), (४) आणि (५) मधील अधिकार ठराव करून डायरेक्टरांच्या कमिटीस, मॅनेजिंग डायरेक्टरांस, मॅनेजिंग एजंटास किंवा मॅनेजरांस देतां येतील. ते देतांना प्रत्येक बाबतींत कमाल मर्यादा घालून दिली जाईल. वरील सर्व अधिकारांवर बंधनें व अटी घालण्याचा अधिकार कंपनीच्या साधारण सभेस आहे.

डायरेक्टरांच्या अधिकारास खालील मर्यादा राहातील.—

(१) कंपनीची सर्व मालमत्ता विकणें, भाड्यानें देणें.

(२) डायरेक्टराकडून असलेल्या येण्यास मुदत देणें किंवा सूट देणें.

(३) कायदा अंमलांत आल्यानंतर, कंपनीच्या खपलेल्या भांडवलापेक्षा व मोकळ्या रिझर्व्हपेक्षा ज्यास्त कर्ज (पूर्वीचें कर्ज धरून) उभारणें.

(४) कोणत्याहि वर्षी ५ हजार रुपयांपेक्षा किंवा पूर्वीच्या तीन वर्षांतील सरासरी निव्वळ नफ्याच्या ५% पेक्षा, जी रक्कम ज्यास्त भरेल तीपेक्षा अधिक देणग्या देणें.

मध्यवर्ती सरकारच्या पूर्व मंजुरीखेरीज कोणतीहि कंपनी खालील लोकांना कर्ज देऊं शकणार नाहीं.

(१) कंपनीचा डायरेक्टर.

(२) डायरेक्टर भागीदार असलेली फर्म.

(३) ज्या कंपनींत डायरेक्टर अथवा सभासद असेल, अशी प्रायव्हेट कंपनी.

(४) ज्या कंपनीच्या साधारण सभेंत २५% पेक्षां ज्यास्त मताधिकार कर्ज देणाऱ्या कंपनीच्या डायरेक्टराच्या किंवा डायरेक्टरांच्या हातीं आहे, अशी लिमिटेड कंपनी.

वरील अटी खालील कंपन्यांनीं दिलेल्या कर्जास लागू नाहींत:—

(१) प्रायव्हेट कंपनी (पब्लिक कंपनीची सबसिडीअरी कंपनी असेल तर) नें दिलेलें.

(२) बँकिंग कंपनीनें दिलेलें.

(३) होल्डिंग कंपनीनें सबसिडिअरी कंपनीस दिलेलें.

कर्ज देण्याबाबतचा कायदा मोडणारा (कर्ज घेणारासुद्धां) ५,००० रु. दंड व ६ महिने कारागृहवास ह्या शिक्षेस पात्र होईल. कर्जफेड झाली, तर कारागृहवासाची शिक्षा दिली जाणार नाहीं आणि कर्जाची ज्या प्रमाणांत फेड झाली असेल त्याप्रमाणें कारागृहवासाची शिक्षा कमी होईल. कायदा मोडणारे सर्व मिळून व स्वतंत्रपणें (जॉइंटली व सेव्हरली) जबाबदार राहतील.

## चित्रमयजगत्
### खास औद्योगिक अंक
### ता. १ जानेवारी १९५४ रोजीं प्रसिद्ध होईल.

या अंकांत स्वतंत्र भारतांतील चालू उद्योगधंद्यांची माहिती येईलच, त्याशिवाय भारताच्या औद्योगिक विकासाच्या दृष्टीनें, देशांतील बेकारीला आळा घालण्यासाठीं व परदेशांतील आपली निर्गत वाढविण्याकरतां आणखी कोणकोणते नवीन उद्योग काढतां येतील याचाहि विचार या अंकांत करण्यांत येणार आहे. प्रचंड भांडवलाचे अवाढव्य कारखाने आणि त्याच्या उलट लहान प्रमाणावरील ग्रामीण हस्तव्यवसाय यांचें राष्ट्रसंवर्धनाच्या दृष्टीनें केवढें महत्त्व आहे हें निराळें सांगण्याची जरूरी नाहीं. अशा ज्या छोट्या–मोठ्या उद्योगधंद्यांचा पंचवार्षिक कार्यक्रमांत समावेश झाला आहे त्यांचाहि परामर्श घेण्याचा विचार आहे.

याशिवाय या अंकांत—

"महाराष्ट्रांत कोणते नवीन उद्योगधंदे सुरू करतां येतील?" या विषयावर महाराष्ट्रांतील उद्योगधंद्यांत अग्रेसर असलेल्या कारखानदारांचे विचार संकलित केले जाणार आहेत. 'चित्रमयजगत्'च्या यापूर्वीच्या खास अंकाप्रमाणेंच वाचकांना हा बहुमोल माहितीनें भरलेला विशेषांक संभाव्य वाटेल. पृ. १०० किं. १॥ रु.



### पंचवार्षिक योजनापुस्तिकेचें १३ भाषांत प्रकाशन

"पंचवार्षिक योजना, प्रश्न व उत्तरें" हीं प्रकाशनविभागाची पुस्तिका हिंदीमध्यें प्रकाशित झाली असून आसामी, बंगाली, गुजराती, कानडी, काश्मिरी, मल्याळम्, मराठी, ओरिया, पंजाबी, तामीळ, तेलगु व उर्दू या भाषांत ती प्रकाशित करण्याची व्यवस्था झाली आहे. हिंदी आवृत्ति मूळ इंग्रजी प्रतीबरोबरच मे १९५३ मध्यें प्रकाशित करण्यांत आली. बाकीच्या १२ भाषांतील आवृत्त्या छापण्यांत येत असून या महिन्यांत प्रकाशित होतील; मात्र काश्मिरी आवृत्ति प्रकाशित होण्यास आणखी चार महिने लागण्याची अपेक्षा आहे.

---

उत्तर प्रदेशामधील सहकारी शेती—उत्तर प्रदेशांत सुमारें ३२,००० एकर जमिनींत सहकारी शेती करण्यांत येत आहे. शेती सहकारी संस्थांची संख्या ८८ असून सभासद–संख्या २,००० आहे. राज्यांतील पंचवार्षिक कार्यक्रम पुरा झाला म्हणजे सहकारी शेती संस्थांची संख्या १०० पर्यंत जाईल आणि सहकारी शेतीखालीं असणारी जमीन ४५,००० एकर होईल असा अंदाज करण्यांत आला आहे.


दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.

किर्लोस्कर
पॉवरवर चालणारे


वसंत नं. ३ चरक
"शरद् चरक"
उसाचे चरक
हंगाम नजीक आला!
—सविस्तर माहितीसाठीं आजच लिहा.—
किर्लोस्कर बंधु लि., किर्लोस्करवाडी, (जि. द. सातारा)

दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.
( शिड्यूल्ड बँक )
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २. ( टे. नं. २७६३ )
अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल रु. ७,२४,९१०
खेळतें भांडवल रु. ७५,००,०००
मुंबई शाखा:—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १
श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. द्वा. ग. बापट, उपाध्यक्ष.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.
श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर. टे. नं. २६०७


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.